ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम - ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांचे हस्तांतरण

**महाराष्ट्र शासन**

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन परिपत्रक क्र. ग्रापापु-१००६/प्र.क्र.३५३/पापु-०७

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२ दिनांक ११ ऑक्टोबर, २००६

वाचा:- शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि., क्र.ग्रापापु १०९८/प्र.क्र.२१४/पापु-०७, दिनांक ३०.१०.१९९८

**शासन परिपत्रक**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत योजना पूर्ण झाल्यावर ती एका गावाची स्वतंत्र योजना असल्यास संबंधित ग्राम पंचायतीस व एकापेक्षा अधिक गावांची प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना असल्यास ती संबंधित जिल्हा परिषदेस हस्तांतरीत करण्याबाबतच्या सविस्तर सूचना या विभागाच्या संदर्भिय दि. ३०.१०.९८ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या आहेत.

या सूचनांनुसार ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे हस्तांतरण करण्यापूर्वी त्या योजना सूस्थितीत आहेत किंवा नाहीत याबाबतची संयुक्त पहाणी करून नंतरच योजना हस्तांतरीत करून घेण्याबाबतचा निर्णय घ्यावयाचा आहे. ग्रामीण पाणी पुरवठा योजना हस्तांतरीत करून घेण्यासंदर्भात शासनाने वरीलप्रमाणे सविस्तर सूचना दिल्या असल्या तरी, स्थानिक स्वराज्य संस्थांकडे हस्तातरीत झालेल्या योजना नादुरुस्त असल्याच्या तक्रारी लोकप्रतिनिधींनी केल्या आहेत.

या संदर्भात शासन अशा सूचना देत आहे की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने तयार केलेल्या योजना स्थानिक स्वराज्य संस्थांनी हस्तांतरीत करून घेण्यापूर्वी त्या योजनांची संयुक्त तपासणी करून योजनेत असलेल्या त्रृटी / दुरुस्त्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून दूर करून घेऊन नंतरच या योजना संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी हस्तांतरीत करून घ्याव्यात.

तसेच या पूर्वी ज्या योजना स्थानिक स्वराज्य संस्थांनी हस्तांतरीत करून घेतल्या आहेत परंतु, त्या हस्तांतरणापूर्वीच नादुरुस्त होत्या व तशी नोंद हस्तांतरणाच्या वेळी केलेली आहे अशा योजनांची माहिती जिल्हा परिषदांकडून घेऊन

अशा सर्व योजनांची दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने त्यांच्या स्व:निधीतून त्वरित करून द्यावी.

सदर शासन परिपत्रक, महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २००६१०१११५४२४९००१ असा आहे.

महाराष्ट्राचें राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(ना. रा. शेरे)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती